भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २५७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १७/०५/२०१८

१) विवाहीतेला शारीरीक व मानसिक त्रास देवुन मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक १४/०५/२०१८ चे २१.३० वाजता पुर्वी पासुन यातील आरोपी क्र.०१ हा यातील फिर्यादी चा पती असुन आरोपी क्र. २ ही सासु लागते लग्न झाल्यापासुन फिर्यादीचा पती हा क्षुल्लक घरगुती कारणावरुन भांडण करुन नेहमी शिवीगाळ करुन मारपीट करीत असतो, यातील आरोपीतांनी संगनमत करुन पोळया न बनविण्याच्या कारणावरुन फिर्यादीस रात्रीचे वेळी मारपीट करुन घराबाहेर काढले व मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ४९८(अ),३२३,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

२) मोटार सायकलची चोरी :—

दिनांक १४/०५/२०१८ चे १९.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ईश्वर विश्वनाथ काळे वय ३२ वर्ष, रा. किसन नगर खात रोड भंडारा याने मावसाच्या नावाने असलेली हिरो होंडा स्प्लेन्डर मोटार सायकल क्र. एमएच ३६/अ ९०८६ काळया रंगाची गुलाबी रंगाचे पट्टे असलेली किंमती १५,०००/—रु. फिर्यादीने खामतलाव चौक भंडारा येथे दुकानासमोर उभी ठेवुन सामान ठेवुन सामान घेण्यास दुकानात गेला असता कोणीतरी अज्ञात चोराने नेल्याने व फिर्यादीने आजुबाजुला शोध घेवुन मिळुन आल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. ऊईके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

३) अश्लिल श्ब्दात शिवीगाळ करून चाकुने मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक १६/०५/२०१८ चे १२.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हे त्याचे जखमी मित्रासह बारमध्ये दारू पित असतांनी जखमी सतिश तुरकर व आरोपी यांच्यात शाब्दीक भांडण होवुन अश्लिल शब्दात शिवीगाळ केल्या वरून आरोपी चाकु घेवुन जखमीचे हातावर, पोटार व मानेवर वार करून जखमी केल्याने फिर्यादी खेमराज आसाराम मेंठंगले वय ४४ वर्ष रा. शक्ती नगर खात रोड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,२९४,३५१ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. महालगावे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

४) हयगयीने ज्वालाग्रहीत वस्तु बेकायदेशीर रित्या चारचाकी वाहनामध्ये मिळुन आल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक १६/०५/२०१८ चे १५.०० ते १६.३० वाजता दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करून शासकीय अनुदानीत एचपी गॅस १ एच.पी. कंपनीचे गॅस सिलेंडर ज्यामध्ये घरगुती वापरासाठी एस.आर. न. ७५८५ डब्ल्यु.पी. १५.७ केजे चे अर्धवट रिकामे सअलेले कि. अंदाजे ७५०/रु. १ एच.पी. कंपनीचे गॅस सिलेंडर नंबर ३२९९१८ यु.डब्ल्यु. १५.८ केजीचे अर्धवट रिकामे असलेले कि. अंदाजे ७५०/रु., २ लाकडी पाटीवर फिट असलेल्या ट्रान्सिपर असलेल्या मशिन, २ लोखंडी रॉडसह ज्याना प्रत्येकी २ रबरी पाईप एका पाईपला पिवळे रेगुलेटर पिवळया धातुचे व दुस—या पाईपला लोखंडी गन लागलेली असलेले कि. अंदाजे ५०००/रु., १ मारोती ओमनी क्र. एमएच ३३ ए— १४७२ सिल्हवर रंगाची जिला गॅसकिट लागलेली किमती अंदाजे १,५०,०००/रु., १ पांढ—या रंगाची ओमनी क्र.एमएच ३६ झेड ०७६३ सिल्वहर रंगाची जिला गॅसकिट लागलेली किमती अंदाजे १,५०,०००/रु. असा एकुण ३,५६,५००/रु. चा मुद्देमाल, बेकायदेशीर रित्या चारचाकी वाहनामध्ये गॅस ट्रान्सपर मशिन द्वारे हयगयीने ज्वालाग्रहीत गॅसमुळे स्वतःचे व इतरांचे जिवीतास धोका निर्माण होईल अशा परिस्थीतीत भरतांनी मिळुन आले त्याचे हे कृत्य जिवनावश्यक वस्तु अधीनियम १९५५ वरील कलमान्वये होत असल्याने सरतर्फे फिर्यादी पो.नी. घुसर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३,७,जिवनावयक वस्तु अधी. १९५५ सहकलम २८५,३३६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. पोटे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

५) अश्लिल श्ब्दात शिवीगाळ करून मारहान केल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक १६/०५/२०१८ चे ०९.३० वाजता दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करून गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादीस पाण्याच्या वादावरून अश्लिल शब्दात शिवीगाळ करून महिलेस मारहान केल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १३४,२९४,३२,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**६) निष्काळजीपणे वाहन चालवुन चिमुकल्यास धडक मारून गंभिर जखमी केल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक १०/०५/२०१८ चे १९.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचा मुलगा अंशुल वय ०४ वर्ष हा घराचे अंगणातुन रोडवर जात असतांनी यातील आरोपी अज्ञात मोटार सायकल चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचा मुलास धडक मारल्याने पोटाचे आतील आतळी तुटुन गंभिर जखमी करून मोटार सायकल चालक पळुन गेल्याने फिर्यादी जगदीश केवळराव काटेखाय वय ३५ वर्ष रा. खातखेडा यांचे तोंडी रिपोर्ट व एमएलसी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी. सहकलम १८४/१३४/१८७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.ना. राहागंडाले पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**७) नगदी पैसे व चांदीच्या दागिन्याची चोरी :-**

दिनांक १५/०५/२०१८ चे १९.१५ ते १६/०५/२०१८ वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही आपले बहिनीकडे हसारा येथे मुलीसह गेली असता कोणीतरी अज्ञात चोराने समोरील दाराचा कुलुप कोंडा तोडुन आत प्रवेश करून बेडरूम मधील लोंखडी आलमारीत ठवलेले ५००/रु., च्या २० नोटा एकुण १०,०००/रु. , ४ तोडे चांदीचे पायल कि. ८००/रु. , २ तोडे चांदीचे पायल कि. ४००/रु., ३ जोडे चांदीचे बिचवे कि.५००/रु., १ चांदीचा खोजना कि.५००/रु. असा एकुण १२,२००/रु. चा माल कुनीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने तसेच सेवकराम शरनागते यांचे घरी सुध्दा ते बाहेरगावी असतांना त्याचे घराचा कुलुप कोंडा तोरुन घरफोडी केली असे फिर्यादी सौ. सुमन हिरालाल कटरे वय ३७ वर्ष रा. हसारा टोली यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बावणे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**८) पैश्याची फसवणुक केल्याने गुन्हा नोद :-**

दिनांक १६/०५/२०१८ चे १५.०० वाजता दरम्यान यातील आरोपीतांनी फिर्यादीस एक्साईज डयुटीवाले आहोत तुमची बॅग तपासायची आहे. असे बोलुन त्यांनी एकुण १९,७५०/रु. ढकवणुक करून फसवणुक केल्याने फिर्यादी रमेश सोनाबापु बहेकार वय ४९ वर्ष रा. रीसामा जि. गोंदीया यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४१९,४२०,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. शहारे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**९) ट्रकचे टायर फुटुन स्वत: जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक १६/०५/२०१८ चे ५.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक हयगीने, निष्काळजीपणे चालवुन ट्रकचे समोरील उजवे बाजुचा टायर फुटला व ट्रक डिव्हायडर कडुन साईडला जावुन रोडाचे खाली उतरून कॅबीनची तुटफट होवुन स्वत: जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने, फिर्यादी बलजिंदरसिंग मरतानसिंग बल वय ३२ वर्ष रा. एल.आय.सी ३४ एम.पी.एच.बी. कॉलोनी कार्तीगंज रायपुर यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोसरे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**१०) लॉन्ड्री दुकानातुन २ बॅटरी व इनव्हरटर ची चोरी :-**

दिनांक १३/०५/२०१८ चे १६.०० ते दि १६/५/२०१८ चे ११.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचे किरायाचे मकानात असलेल्या लॉन्ड्री दुकानाचे मागचे बाजुला असलेली खिडकी कोणीतरी अज्ञात चोराने तोडुन आत प्रवेश करून बंद असलेल्या लॉन्ड्री दुकानातुन २ बॅटरी कि. १९,३००/रु., २ इनव्हरटर कि. ८७००/रु. आसा एकुण २८,०००/रु. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी नाशिक अर्जुन बिंजेवर वय २६ वर्श रा. सुंदरटोला यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ४५४,४५७,३८० भादवी. . अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मुंडले पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

**११) अनोळखी इसमाचे प्रेत मृत अवस्थेत मिळुन आल्याने गुन्हा नोंद :-**

दिनाक १६/०५/२०१८ चे १९.०० वाजता दरम्यान यातील अनोळखी मृतक हा उसरीपार शिवरात चोवा ते श्रीनगर जाणा-या नहारात मृत अवस्थेत मिळुन आल्याने फिर्यादी कु. अर्चणा नागोसी चाचेरे वय २७ वर्ष रा. श्रीनगर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. डोंगरे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

१२) आमरोड वर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :—

**दिंनाक** १६/०५/२०१८ चे १७.०० ते १७.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मारोती वाहन ही निलज येथे सार्वजनीक रोडवर येणाऱ्या —जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका व वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशा स्थितीत मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. कोडवते यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास कोडवते पोलीस स्टेशन पवनी करीत आहेत.

१३) आमरोड वर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :—

दिंनाक १६/०५/२०१८ चे १८.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील काळी—पीवळी वाहन ही साकोली बस स्थानक येथे सार्वजनीक रोडवर येणाऱ्या —जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका व वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशा स्थितीत मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोना. निंबार्ते यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. निंबार्ते पोलीस स्टेशन पवनी करीत आहेत.
पवनी करीत आहेत.

१४) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवीतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :—

दिनांक १६/०५/२०१८ चे १८.४० वाजता दरम्यान यातील आरोपी हा त्याचे ताब्यातील वाहन दारु पिवुन दारुचे नशेत पोस्ट ऑफीस भंडारा येथे वाहन चालवितांनी मिळुन आल्याने त्याचे बिथ्रअल्कोहोल ॲनालायझर मशिन व्दारे श्वासाचा नमुना घेतला असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. कांबळे वानीशा भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५(१) मो.वा. का. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पोना. साबळे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

१५) अवैध हातभट्टी दारु/ जुगार अडड्यांवर धाडी . :—

दिनांक १६/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन तुमसर साकोली व लाखनी येथे अवैध हातभट्टी दारू/ जुगार अडड्यावर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १५ लिटर हातभंट्टी दारू किंमती १५००/—रु. तसेच जुगारातुन किंमती १०,५५२/—रु. तसेच असा एकुण किंमती १२,०५२/—रु. चा माल जप्त करण्यात आला.

१६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक १६/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १८८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी वाहतुक— ०१ तीन सिटर वाहनाकरीता— १३ ईतर वाहनांवरती — १७४ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनि.प्रणती लांजेवार)
माहिति कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.
**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.